# राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.) २०२३-२०२४

५ महाराष्ट्र एनसीसी बाटलियन अंतर्गत आपल्या श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात एनसीसी विभाग अतिशय सक्षमपणे कार्यरत आहे. दरवर्षी प्रमाणे या वर्षी ०४ ऑगस्ट २०२३ रोजी भरती प्रक्रिया राबविण्यात आली. त्यामध्ये एनसीसी मध्ये सहभाग नोंदविणाऱ्या मुला-मुलींची वैदकीय तपासणी, शारीरिक चाचणी व पालकांच्या सम्मती सह एकूण ५३ कडेट्सना संधी देण्यात आली.

सर्व भरती झालेल्या मुला मुलींना एकता व अनुशासना बरोबर आर्मी व पोलिस भरती साठी सक्षम बनविण्यासाठी तयार करण्यात आले. महाविद्यालयात दर बुधवारी व शनिवारी नियमित होणाऱ्या परेड मध्ये ड्रिल, अनुशासन, शस्त्र प्रशिक्षण, योगासन, प्राथमिक उपचार पद्धती व कर्तव्य ई. गोष्टीचे ज्ञान दिले जाते. विभाग प्रमुख म्हणून कॅप्टन प्रशांत पाटील हे काम पाहतात. या वर्षा करिता सीनियर अंडर ऑफिसर चेतन परब, जूनियर अंडर ऑफिसर तुषार जाधव व कोमल पाटील, सी एस एम सानिक पाटील, सी क्यू एम एस ऋषिकेश मागदुम तसेच सार्जंटपदी अर्पिता पाटील, अक्षता कारेकर व योगेश पाटील यांनी काम पाहिले.

या वर्षी प्रथमच सर्व कडेट्सनी २६ जानेवारी २०२४ रोजी प्रजासत्ताक दिन व नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती निमित्त संचलन प्रात्यक्षिक (ड्रिल डेमो) बसविण्यात आले. यामध्ये कडेट्सनी DST, SILENT DRILL व सर्व प्रकारचे SALUTE याचे अतिशय शिष्तबद्ध प्रात्यक्षिक करून दाखविले. विशेष बाब म्हणजे या वर्षी एनसीसी विभागातील ४ कडेट्सनी EBSB व ARMY ATTACHMENT कॅम्प मध्ये सहभाग नोंदविला. तसेच कॅडेट श्रेयश पाटील याची इंडियन आर्मी मध्ये अग्निवीर पदावर भरती झाली.

## एनसीसी विभागामार्फत विविध उपक्रम :

### १) १५ दिवासीय योग शिबीर २०२३

महाविद्यालयाच्या क्रीडा व एन.सी.सी. विभाग आणि योग विद्या धाम यांच्या संयुक्त विद्यमाने MoU अंतर्गत दिनांक ०५ ते २० जून २०२३ रोजी अंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त १५ दिवासीय योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरास आर्ट ऑफ लिविंगचे योग प्रशिक्षक प्रा. रणजीत पाटील यांनी योग आसन प्रात्यक्षिकसह त्याचे शरीराला होणारे फायदे विषद केले. या शिबिरास विद्यार्थी, खेळाडू व एन.सी.सी. कॅडेट उपस्थित होते. या शिबिराचे नियोजन कॅप्टन डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

### २) अंतरराष्ट्रीय योग दिन २०२३

महाविद्यालयाच्या क्रीडा व एन.सी.सी. विभाग आणि योग विद्या धाम यांच्या संयुक्त विद्यमाने MoU अंतर्गत दिनांक २१ जून २०२३ रोजी अंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. या समारंभास प्रमुख अतिथि म्हणून आचार्य योगेश्वर आनंद अवधूत व प्रा. आर. एस. पाटील उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण हे होते. आचार्य योगेश्वर आनंद अवधूत यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी योग व मेडिटेशन करणे किती गरजेचे आहे हे समजावून संगितले. तसेच प्रा. आर. एस. पाटील यांनी योग आसनांसह त्याचे शरीराला होणारे फायदे विषद केले. या समारंभास सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. या समारंभाचे नियोजन कॅप्टन डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

### ३) छ. शाहू महाराज जयंती निमित्त प्रभात फेरी

श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या व महाविद्यालयाच्या वतीने दिनांक २६ जुलै २०२३ रोजी छ. शाहू महाराज जयंती निमित शहरातील प्रमुख मार्गावरून प्रभात फेरी काढण्यात आली. यावेळी एनसीसी कडेट्सनी सरदार व छ. शाहू महाराजाणंची वेशभूषा करण्यात आली व चित्ररथद्वारे समाज्यात महाराजचे विचार पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. या उपक्रमास मा. चेअरमन मानसिंग बोंद्रे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, महाविद्यालयाचे विद्यार्थी व एनसीसी कॅडेट उपस्थित होते.

### ४) वृक्षा रोपण

महाविद्यालयाच्या एनसीसी विभागच्या वतीने दिनांक ०७ जुलै २०२३ रोजी महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमावेळी मा. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण सर यांचे हस्ते व आय क्यू ए सी समन्वयक डॉ. आर. डी. मांडनीकर, डॉ. डी.एल. काशीद पाटील व इतर मान्यवराच्या उपस्थितीत प्राथमिक स्वरुपात वृक्षारोपण

करण्यात आले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व एनसीसी कॅडेट उपस्थित होते. या समारंभाचे नियोजन कॅप्टन डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

**५) रक्षा बंधन समारंभ**

महाविद्यालयाच्या एनसीसी विभाग व स्त्री व्यक्तिमत्व विकास समितिच्या वतीने दिनांक ३० ऑगस्ट २०२३ रोजी रक्षा बंधन निमित्त लक्ष्मीपूरी पोलिस ठाणे येथील अधिकारी व कर्मचारी यांना राखी बांधून व मिठाई देवून साजरा करण्यात आला. संरक्षणासाठी अग्रणी असणाऱ्या आपल्याच बांधवांबरोबर रक्षा बंधन साजरे करण्यासाठी एनसीसी मुलींच्या बरोबर महाविद्यालयातील विधार्थिनीही उपस्थित होत्या. यावेळी ठाणे अमलदार यांनी सर्व विद्यार्थिनींना पोलिस ठाणे व त्याच्या कामकाज या संदर्भात सर्व माहिती दिली. यावेळी स्त्री व्यक्तिमत्व विकास समितिच्या सर्व महिला प्राध्यापिका हजार होत्या. या समारंभाचे नियोजन कॅप्टन प्रशांत पाटील व डॉ. सौ. एन. डी. काशीदपाटिल यांनी केले.

**६) व्याखान: शासकीय नोकरी संदर्भात मार्गदर्शन**

महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाच्या वतीने दिनांक ०१ सप्टेंबर २०२३ रोजी “शासकीय नोकरी संदर्भात मार्गदर्शन” या विषयावर ADU GENIUS ACADEMY चे संचालक प्रा. विष्णु भोसले यांच्या व्याखाणाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्लेसमेंट सेल चे प्रमुख प्रा. संतोष कांबळे व सायन्स विभागाच्या प्रा. सौ. कुलकर्णी मॅडम उपस्थित होते. प्रा. विष्णु भोसले सर यांनी शासकीय सेवेतील विविध पदावर कोण कोणत्या संधि उपलब्ध आहेत व त्याच्या साठी लागणाऱ्या पात्रता याचे अतिशय साध्या भाषेत PPT द्वारे समजावून संगितले. यावेळी शिक्षक, विद्यार्थी व एनसीसी कॅडेट उपस्थित होते. या समारंभाचे नियोजन कॅप्टन डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

**७) गणेश उत्सव निमित्त स्वच्छता अभियान**

महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाच्या वतीने दिनांक ३० सेप्टेंबर २०२३ रोजी गणेश उत्सवानिम्मीत्त अनंत चतुर्थीच्या दुसऱ्या दिवशी पंचगंगा नदीवरील मूर्ति विसर्जन ठिकाणी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या वेळी महानगर पालिकांच्या कर्मचाऱ्यांना हातभार लावण्यासाठी नदी जवळील विविध सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता करण्यात आली. तसेच मूर्ति दान उपक्रम व प्लॅस्टिक मुक्ती होण्यासाठी समाज प्रभोधन करण्यात आले. यावेळी सर्व एनसीसी कॅडेट उपस्थित होते. या समारंभाचे नियोजन कॅप्टन डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

**८) एनसीसी दिनानिमित्त रुग्णांना फळे वाटप – विधायक कार्य**

महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाच्या वतीने दिनांक २९ नोव्हेबर २०२३ रोजी एनसीसी दिन निमित्त रुग्णांना फळे वाटप करण्याचे विधायक कार्य करण्यात आले. यावेळी कसबा बावडा येथील शासकीय सेवा रुग्णालयातील १०० हून अधिक रुग्णांना फळांचे वाटप सर्व कडेट्सच्या हस्ते करण्यात आले. या वेळी सेवा रुग्णालयाच्या वैदकीय अधीक्षक डॉ. नीलिमा पाटील यांनी या विधायक कार्याचे कौतुक केले व सर्वांचे आभार मानले. तसेच सपूर्ण रुग्णालयाची कार्यप्रणाली व शासकीय वैदकीय सोयीसुविधांबद्दल कडेट्स ना माहिती करून दिल्या. यावेळी आय क्यू ए सी समन्वयक डॉ. आर. डी. मांडनीकर, डॉ. डी. के. वळवी, डॉ. एन. एस. जाधव व डॉ. डी.एल. काशीद पाटील उपस्थित होते. या कारेक्रमाचे नियोजन प्रा. सौ. गौरी पाटील व कॅप्टन डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

**९) जागतिक एड्स डे रॅली**

महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाच्या वतीने दिनांक ०१ डिसेंबर २०२३ रोजी जागतिक एड्स डे निमित्त सी पी आर रुग्णालय व शासकीय कर्मचाऱ्यांबरोबर रॅली चे आयोजन करण्यात आले. यावेळी शहराच्या प्रमुख चौकातून प्रभोधन रॅली द्वारे एड्स रोगाबद्दल जनजागृती करण्यात आली. सर्व कडेट्स नी हातात प्रभोधंनात्मक फलक घेवून व घोषणा देत रॅली मध्ये सहभाग नोंदविला.

**१०) रक्तदान शिबीर**

महाविद्यालयाच्या एनसीसी व एनएसएस विभागाच्या वतीने दिनांक २८ डिसेंबर २०२३ रोजी संस्थेचे माजी चेअरमन स्व. श्रीपतरावजी बोंद्रे दादा यांच्या जयंती निम्मीत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरास एकूण ४० रक्त दात्यानी रक्त दान केले. या कार्यक्रमास मा. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण सर यांनी रक्त दान करण्याचे महत्व संगितले व कार्यक्रमास प्रोत्साहन दिले. यावेळी शिक्षक, विद्यार्थी व एनसीसी कॅडेट उपस्थित होते. या समारंभाचे नियोजन एनएसएस प्रमुख डॉ. डी.एल. काशीद पाटील व कॅप्टन डॉ. प्रशांत पाटील यांनी केले.

**११) राष्ट्रीय मतदार दिन**

महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाच्या वतीने दिनांक २५ जानेवारी २०२४ रोजी राष्ट्रीय मतदार दिन निमित्त जिल्हाधिकारी कार्यालय व शासकीय कर्मचाऱ्यांबरोबर मतदार जागृती रॅली चे आयोजन करण्यात आले. यावेळी शहराच्या प्रमुख चौकातून प्रभोधन रॅली द्वारे मतदान करण्याबद्दल जनजागृती करण्यात आली. सर्व कडेट्स नी हातात प्रभोधनात्मक फलक घेवून व घोषणा देत रॅली मध्ये सहभाग नोंदविला.

**१२) नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती निमित्त संचलन प्रात्यक्षिक**

या वर्षी प्रथमच सर्व कडेट्सनी २६ जानेवारी २०२४ रोजी प्रजासत्ताक दिन व नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती निमित्त संचलन प्रात्यक्षिक (ड्रिल डेमो) बसविण्यात आले. यामध्ये कडेट्सनी DST, SILENT DRILL व सर्व प्रकारचे SALUTE याचे अतिशय शिष्तबद्ध प्रात्यक्षिक करून दाखविले. या कार्यक्रमावेळी मा. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण सर यांनी या प्रकारच्या उपक्रमामुळे एनसीसी कडेट्स बरोबर सर्व साधारण विद्यार्थ्यांच्यामध्येही देश प्रेमाची भावना निर्माण होते व एक प्रकारची ऊर्जा मिळते असे प्रतिपादन केले. यावेळी शिक्षक, विद्यार्थी व एनसीसी कॅडेट उपस्थित होते. या समारंभाचे नियोजन कॅप्टन प्रशांत पाटील यांनी केले.

कॅप्टन डॉ. प्रशांत पाटील
एनसीसी विभाग प्रमुख